*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# स्वतंत्र विदर्भ चळवळ?

**प्रा. सुनिता रामधन गवई**

राज्यशास्त्र विभाग , एलफिस्टन महाविद्यालय फोर्ट, मुंबई sunitarmgawai@gmail.com

..............................................................................................................................

१ मे २०२० ही तारीख म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या हिरकमहोत्सवी वर्षाची. आज आपणच नाही तर संपुर्ण जग कोरोना महामारीच्या भीषण संकटातुन जात असतांना महाराष्ट्राला मात्र हा महोत्सव म्हणावा तसा साजरा करता आला नाही. महाराष्ट्राला सामाजिक राजकिय व सांस्कृतिक दृष्टया बुध्दीवादी आणि समाजसुधारकांचा वारसा लाभलेला आहे. आज या साठीच्या आणि प्रगतीशील(?) महाराष्ट्राचा विचार केला तर असे लक्षात येते कि, स्वातंत्र्यानंतर सर्वांगीन विकासाचा समतोल ज्या प्रमाणामध्ये साधल्या गेला पाहीजे होता तसा तो साधला गेला नाही. त्याचाच परिणाम म्हणजे स्वतंत्र विदर्भ चळवळ.

भारतामध्ये आतापर्यंत अनेक चळवळी झाल्या आहेत. खरंतर येथील सामाजिक आणि राजकिय चळवळींचा अभ्यास हा बराच व्यापक विषय आहे. आजच्या राजकारणावर नवसामाजिक चळवळींचा मोठा प्रभाव दिसुन येतो. या सामाजिक चळवळीमधुन राजकिय नेतृत्वात सतत बदल होत असतो.Social म्हणजे सामाजीक क्षेत्र सार्वत्रीक जीवनात व्यक्तीगत कल्याणापेक्षा अधिक महत्वाचे आहे. सामाजीक क्षेत्रातील काही प्रश्न राज्याला सोडवता आले नाहीत. राहीलेल्या सामाजिक प्रश्नांचा विषय बनवायचा आणि त्यावर आंदोलने छेडायची यालाच विषयाचे राजकारण म्हणतात. थोडक्यात, नविन सामाजिक चळवळीचा उददेश सार्वजनिक क्षेत्रातील उरलेल्या प्रश्नांसाठी आंदोलने करणे हा आहे सामाजिक चळवळीची ख-या अर्थाने सुरुवात जरी १९ व्या शतकात झाली तरी सामान्यतः सामाजिक चळवळींचा अभ्यासविषय २० व्या शतकात विकसित झाला. या सामाजिक चळवळींच्या विकासाबाबत महाराष्ट्रात चार टप्पे पाडण्यात येतात.

१ १९ वे शतक ते स्वातंत्र्य चळवळीपर्यंतचा काळ २ १९५० — १९६८

३ १९६८ — १९८० ४ १९८० — २०२०(आजतागायत)

वरीलपैकी, प्रस्तुत विषयाच्या विवेचनाचा विचार केला असता स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीचा आढावा घेत असतांना हा १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासुन सुरु होतो. पहिल्यांदा १८८९ साली लखणौ येथील कॉग्रेसच्या अधिवेशनात विदर्भास वेगळया प्रांताचा दर्जा देण्यात यावा ही मागणी करण्यात आली होती. १९२० साली नागपुरच्या कॉग्रेस अधिवेशनात स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांत निर्माण करण्याचा ठराव संमत झाला. एवढेच नाही तर १९५३ साली फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना करण्यात आली व या अहवालात (१९५५) स्वतंत्र विदर्भास मान्यता देण्यात आली. मराठी माणसाच्या हितार्थ विदर्भ प्रथम १९५६ च्या नागपुर करारा व्दारे मुंबई प्रांतात सामील करण्यात आला. राज्यात विदर्भासारखे भाग मागास राहु नये अशा अर्थाचा हा नागपुर करार होता. पुढे १९६९ साली महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांनी प्रादेशिक विकासाचा आग्रह न धरता जिल्हा हा विकासाचा घटक मानुन नागपुर करार हळुच बाजुला सारला.

संयुक्त महाराष्ट्रामध्ये विदर्भ विलीन होत असताना नागपुर करारानुसार विदर्भाला प्रत्येक क्षेत्रात योग्य व न्याय्यवाटादिला जाईल असे आश्वासन दिले गेले होते. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेली शंका खरी ठरली ती म्हणजे विदर्भाने कोणतेही राजकिय करार महाराष्ट्रासोबत करण्याऐवजी आपले स्वतः चे राज्य निर्माण करावे. कारण राजकीय करार हे अंमलात न आणता ते केराच्या टोपलीत टाकले जातात. आजही विदर्भाचा विकास हा पश्चिम महाराष्ट्र व कोकणच्या छायेखाली खुंटला असल्याचे दिसुन येते. विदर्भामध्ये बारमाही वाहणा-या नद्या आहेत, तलावाचे जिल्हे आहेत. पण सिंचनक्षमता अपुरी. विजनिर्मिती विपुल प्रमाणात होऊनहीतेथील जनतेस अंधारात रहावे लागते. 'पांढरं सोनं' उगवुनही तेथील शेतक-याच्या आत्महत्यांच प्रमाण सर्वाधीक. कारखानदारी क्षेत्रातील दरडोई उत्पन्नाचा विचार करता पश्चिम महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न मराठवाड्याच्या तीप्पट व विदर्भाच्या दुप्पट असल्याचे दिसुन येते. महाराष्ट्रातील १२.२ % खनिज क्षेत्रापैकी जवळपास जास्तीत जास्त ७०% खनिज क्षेत्रफळ विदर्भात आहे. विदर्भात वने, चुनखडी, क्रोमाईट, मॅगनीज व इतर नैसर्गिक संसाधने मुबलक प्रमाणात आढळतात. हीच नैसर्गिक संसाधने महाराष्ट्राच्या इतर भागांत वापरली जातात. याव्यतीरिक्त संत्री, तेलबीया, ज्वारी व फळांचे उत्पादनही मोठया प्रमाणात घेतले जाते. असे असुनही विदर्भावर शतकानुशतके अन्याय झालेला दिसुन येतो. प्रशासकिय कामाच्या दृष्टीने नागपुर विभाग ते मुंबई असा ८०० कि.मी. चा खर्चिक प्रवास करुन मंत्रालयात जाणे

हे सामान्य माणसाच्या अवाक्या बाहेरचे आहे. त्यामुळे विकास कामांना खीळ बसते. अशा परिस्थितीत विदर्भाचा विकास होणे दुरापास्त आहे. केवळ भाषिक भावनेच्या प्रेमा पोटी दारिद्रयात राहणे शक्य नाही. याबाबत आचार्य विनोबा भावे यांचे मत विशेष माननीय आहे. ते म्हणतात, "मराठीची दोन राज्ये झाली तरी चालेल परंतु, विदर्भाचा स्वयंनिर्णयाचाहक्क नाकारता येणार नाही. एका राज्यात एकच भाषा असावी इतपत ठीक आहे. परंतु एका भाषेचे एकच राज्य असावे असे म्हणणे हटवादीपणाचे ठरेल."

या मुद्दयावर धार कमीशन, राज्य पुनर्रचना आयोग, जे.व्हि.पी. आयोग यांच्या शिफारशी सुध्दा वेगळे विदर्भ राज्य व्हावे या मताला दुजोरा देतात. प्रादेशिक अनुशेष भरुन काढण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या ३७१ व्या कलमान्वये १९९४ साली वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्यात आली. परंतु विदर्भ विकास मंडळाने सुध्दा विदर्भाची सांस्कृतीक, आर्थिक व राजकिय प्रगती साधता आली नाही. राजकिय पक्षांनी सुध्दा वेळोवेळी मतांच्या राजकाराणासाठी या मुद्दयाचा सोईस्कररित्या वापर केलेला दिसुन येतो. भा.ज.प. ने निवडणुक जाहीरनाम्यात स्वतंत्र विदर्भाचे वचन जनतेस दिले. २००० साली छत्तीसगड, झारखंड आणि उत्तरांचल राज्यांची स्थापना झाली तेव्हा स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीचा जोर धरुन बंद पुकारल्या गेला. शिवसेना वगळता जवळपास सर्वच राजकिय पक्षांनी या बंदला पाठींबा दिला. कॉंग्रेसने मात्र तळयात मळयात करत विदर्भात आपली सत्ता जाईल या भिती पोटी शिवसेने सोबत संसदेत वेगळ्या विदर्भाला विरोध केला. त्यानंतरही २०१०, २०१३ ला आंदोलने झाली परंतु तेलंगाणा राज्याच्या मागणीसाठी जशी तीव्र आंदोलनाची सातत्यता टिकुन होती व सर्व जनतेचा जसा पाठींबा त्यासाठी लाभला तसे चित्र विदर्भात बघायला मिळाले नाही, ही खेदाची बाब म्हणावी लागेल. बापुजी बियानी, मारोतराव कन्नमवार, जांबुवंतराव धोटे, बापुजी अणे, बनवारीलाल पुरोहीत, वामनराव चटप, श्रीहरी अणे व आशिष देशमुख अशा नेते मंडळीनी स्वतंत्र विदर्भाचे समर्थन करुन चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला परंतु या मागणीसाठीची चळवळ ही जन चळवळ होउ शकली नाही. नेतेमंडळीमध्ये समन्वय व एकता नसल्यामुळे या आंदोलनास म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. वास्तविक स्वतंत्र विदर्भाचा मुद्दा प्रखरतेने, जोरकसपणे मांडता येईल अशा नेत्याच्या प्रतिक्षेत आजही ही चळवळ आहे. देवेंद्र फडणविस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना विदर्भवासियांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या; परंतु त्यांच्याच स्वतःच्या नागपुर भागामध्ये त्यांना पुरेसा विकास साधता आला नाही तर उर्वरित कल्पना न केलेली बरी. स्वातंत्र्याचाअमृत महोत्सव(७५ वर्षे)साजरा करण्यासाठी आपण सज्ज होत आहोत परंतु आजही महाराष्ट्रातील हा भाग जर बघीतला तर तिथे मेळघाटातील कुपोषण, नक्षलवादी चळवळ, आदिवासींचे प्रश्न, शेतक-यांच्या आत्महत्या आणि दारिद्र याखेरीज जास्त काही वेगळे चित्र दिसुन येत नाही. आदिवासींना निदान आरोग्य व शिक्षणाची सोय व्हावी म्हणुन बाबा आमटे व डॉ. अभय बंग यांनी आपले आयुष्य पणाला लावले आहे. परंतु या मुलभुत व अत्यावश्यक सुविधा पुरविण्यासाठी त्यांना तारेवरची कसरत करावी लागते. महाराष्ट्र सरकार त्यांच्या या उपक्रमाविषयी आजही उदासिन असल्याचे दिसुन येते. या समस्यांचे निराकर महाराष्ट्रात राहुन करता येणे शक्य नाही. ही काळयादगडावरची रेघ आहे. यावर एकच उपाय आहे तो म्हणजे स्वतंत्र विदर्भ राज्य त्यासाठी मा. श्रीहरी अणे यांच्या म्हणण्याप्रमाणे जणमत घेउन निर्णय घ्यावा. महाराष्ट्र विधानसभेत ६६ आमदार विदर्भातुन निवडुन जातात परंतु केवळ आपला राजकिय स्वार्थ साधण्यासाठी आजपर्यंत या मंडळींनी या मुद्दयाला सोईस्कररित्या बगल दिली आहे. हा खरोखरच विदर्भीय जनतेवर अन्याय आहे.

थोडक्यात, स्वतंत्र विदर्भ राज्याच्या चळवळीसाठी नेत्यांमध्ये समन्वय, एकता आवश्यक आहे. खंबीर नेतृत्व सुध्दा काळाची गरज आहे. ही चळवळ प्रत्येक घरामध्ये व घरातल्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोचण्यासाठी प्रयत्न व्हायला पाहीजे. एकुन काय तर विकासाचा असमतोल जर दुर करायचा असेल तर त्यावर एकच पर्याय आहे तो म्हणजे वेगळे विदर्भ राज्य.

संदर्भ :

१ व्दादशीवार सुरेश, १ ऑगस्ट, २०१०, तर महाराष्ट्रासोबत रहायचे कशाला? , साधना साप्ताहीक पुणे.
२. खंडेलवाल श्रीनिवास, २०१२ , विदर्भ राज्य संकल्पना, विद्या प्रकाशन नागपुर.
३ महाराष्ट्र टाईम, ऑगस्ट २०१८, औरंगाबाद.
४ दै. सकाळ, ३१ जुलै २०१३.
५ धोटे जांबुवंतराव, स्वातंत्र विदर्भाचे आंदोलन, लोकसत्ता, २ मार्च २०१३.